# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक २५/१०/२०२४ (शुक्रवार) दुपार**

---

## विधानसभा निवडणूक संबंधाने पोलीस स्टेशन MIDC बुट्टीबोरी अंतर्गत रूटमार्च

पोलीस स्टेशन डप्क्ब बुट्टीबोरी अंतर्गत आज दिनांक २५/१०/२०२४ रोजीचे १६/०० ते १७/०० वा पर्यंत विधानसभा निवडणूक संबंधाने मा. श्री दीपक अग्रवाल (भा.पो.से.) उपविभागीय पोलीस अधिकारी नागपूर विभाग नागपूर यांच्या मार्गदर्शनाखाली रूटमार्च दरम्यान टाकळघाट शिवाजी चौक, महाजन चौक गजानन महाराज मंदिर अमर विद्यालय बस स्टॉप टाकळघाट मेन रोड टाकळघाट खापरी मोरेश्वर चौक टाकळघाट परत शिवाजी चौक टाकळघाट येथील पोलीस अधिकारी यांनी नागरीकांसोबत संवाद साधुन त्यांना निवडणुक संबंधाने मार्गदर्शन करण्यात आले तसेच भयमुक्त आणि शांततेत निवडणुक पार पाडण्याबाबत चर्चा करण्यात आली. असता रूट मार्चमध्ये पोलीस स्टेशन डप्क्ब बुटीबोरी येथील ०३ अधिकारी, १६ अंमलदार तसेच सशस्त्र सीमा बल चे पथक हजर होते. रूट मार्च दरम्यान महाजन चौक टाकळघाट, शिवाजी महाराज चौक टाकळघाट येथील नागरिकांना सशस्त्र सीमा बलचे अधिकारी व कर्मचारी यांनी आगामी विधानसभा निवडणूक संबंधाने कोणत्याही प्रकारची भीती न बाळगता मतदान करण्याबाबत आव्हान करण्यात आले.





<u>**नागपूर उपविभागा अंतर्गत सर्व पोलीस पाटील यांची पोलीस स्टेशन बुट्टीबोरी येथील मीटिंग हॉलमध्ये आगामी विधानसभा निवडणूक संबंधाने बैठक संपन्न**</u>

नागपूर उपविभागा अंतर्गत आज दिनांक २५/१०/२४ रोजी ११/३० वा ते १२/३० पर्यंत मा श्री. दीपक अग्रवाल (भा.पो.से.) उपविभागीय पोलीस अधिकारी नागपूर विभाग नागपूर यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस स्टेशन बुट्टीबोरी, बेला, एमआयडीसी बुटीबोरी येथील सर्व पोलीस पाटील यांची पोलीस स्टेशन बुट्टीबोरी येथील मीटिंग हॉलमध्ये आगामी विधानसभा निवडणूक संबंधाने मीटिंग घेऊन त्यांना विधानसभा निवडणूक संबंधाने गावांमध्ये घडणाऱ्या राजकीय व इतर घटना बाबत वेळीच पोलीस स्टेशनला व भरारी पथक येथील अधिकारी कर्मचारी यांना माहिती देण्याबाबत सूचना देण्यात आल्या.



## गांजा तस्करी करणारे आरोपी स्थानिक गुन्हे शाखेच्या जाळयात

दि. २५/१०/२०२४ रोजी पोलीस ठाणे बोरी परीसरात स्थानीक गुन्हे शाखाचे पथक पेट्रोलींग करीत असतांना त्यांना गुप्त बातमीदाराने खात्रीशीर खबर दिली कि, वर्धा ते नागपूर मार्गावरील समृद्धी हायवे रोड जवळील जीत धाब्याजवळ दोन इसम येणार असून त्यांचे जवळील लगेज बॅग मध्ये अंमली पदार्थ गांजा भरून आहे व ते मुंबई येथे घेऊन जाणार आहे, प्राप्त खबरेची शहानिशा करणेकामी स्थागुशाचे पथकाने सापळा रचून मिळालेल्या माहितीच्या आधारे दोन इसम रोड लगत त्याचे जवळ दोन लगेज सुटकेस घेवुन संशयितरित्या उभे असलेले दिसुन आले. **आरोपी नामे—१) अगणु गोपाळ वर्मा, वय ४६ वर्ष, रा. शाहू नगर बेसा रोड माणेवाडा जि. नागपुर २) कुंदन शंकर इंगोले वय २९ रा धिवरपूरा घाट रोड, जुनी मंगळवारी नागपूर** यांना ताब्यात घेऊन त्यांची व त्यांचे जवळील लगेज सुटकेसची झडती घेतली असता आरोपीतांकडुन १) २९ किलो २१९ ग्राम अंमली पदार्थ गांजा, कि. २,९२,१९०/— रू २) २ मोबाईल किंमती २५०००/— रु ३) २ लगेज बॅग कि ४०००/—रू. असा एकुण ३,२१,१९०/— रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

सदरची कार्यवाही ही पोलीस अधीक्षक नागपुर ग्रामीण श्री. हर्ष ए. पोद्दार (भा.पो.से) तसेच अपर पोलीस अधीक्षक रमेश धुमाळ साहेब यांचे मार्गदर्शनात सहायक पोलीस अधीक्षक श्री. दीपक अग्रवाल, नागपूर विभाग, स्थानिक गून्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. ओमप्रकाश कोकाटे, सहा. पो.नि. किशोर शेरकी, सागर गोमाशे, पोउपनि बट्टू लाल पांडे, सफौ मिलींद नांदुरकर, पोहवा संजय बांते, मयूर ढेकले, आशिष भुरे, पोशी धोंडतात्या देवकाते, रोहित आडे, चालक पोशी सुमित बांगडे, आशुतोष लांजेवार, वसंत राठोड यांनी पार पाडली.



पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर